# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 08 November 2024
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक ०८ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार जोमाने सुरु, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आज धुळे आणि नाशिक इथं सभा
- काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांच्या राज्यात प्रचारसभा, १० नोव्हेंबरला महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध होणार
- सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार – केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

आणि

- हिंगोली इथं प्रचारात सहभागी झालेल्या ग्रामसेवकावर कारवाई करण्याचे आदेश

****

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार जोमाने सुरु आहे. राज्यातल्या दिग्गज नेत्यांसह इतर राज्यातल्या नेत्यांच्या देखील ठिकठिकाणी सभा होत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रचारसंभांना आजपासून सुरुवात होत आहे. आज पहिली सभा धुळ्यात मालेगाव रोड, महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्राजवळ पांजरापोळ गोशाळा इथं होईल. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने सभेच्या काळात या भागात विनापरवाना ड्रोन उडवायला प्रतिबंध घालण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यानंतर दुपारी नाशिक इथं तपोवन परिसरात मोदी यांची सभा होणार आहे. या सभेच्या निमित्ताने प्रशासनाने जय्यत तयारी केली असून, सुरक्षा कर्मचाऱ्यांनी परिसर ताब्यात घेतला आहे. तपोवनासह सुमारे ११ मार्गांवरील वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले असल्याचं आमच्या वार्ताहरानं

कळवलं आहे. महायुतीततल्या घटक पक्षांचे वरिष्ठ नेते या सभांना उपस्थित राहणार आहेत.

****

औरंगाबाद मध्य मतदार संघात महायुतीचे उमेदवार प्रदीप जैस्वाल यांनी काल मित्र पक्षाच्या पदाधिकार्यांसोबत मतदारसंघात पदयात्रा काढली. महायुतीचे औरंगाबाद पूर्व मतदारसंघातले उमेदवार अतुल सावे यांनी काल लोकांशी संवाद साधला.

वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी काल कन्नड मतदारसंघाचे पक्षाचे उमेदवार अयाज मकबूल शहा यांच्या प्रचारासाठी सभा घेतली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात काल दोन प्रचार सभा झाल्या. कन्नड तालुक्यातल्या पिशोर इथं झालेल्या सभेत त्यांनी, महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्याचा पुनरुच्चार केला.

माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी काल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात फुलंब्री विधानसभा मतदारसंघातल्या महायुतीच्या उमेदवार अनुराधा चव्हाण यांच्या प्रचारार्थ लाडसावंगी, पळशी आणि गोलटगाव इथं प्रचारसभा घेतल्या.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार कुलदीप पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ तुळजापूर इथं माजी मंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते तसंच खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांच्या उपस्थितीत काल करण्यात आला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आज धाराशिव जिल्ह्यात तीन प्रचारसभा होणार आहेत. यात परंडा, धाराशिव आणि उमरगा इथले महायुतीचे उमेदवारअनुक्रमे डॉक्टर तानाजी सावंत, अजित पिंगळे आणि ज्ञानराज चौगुले यांच्या प्रचारासाठी या सभा होत आहेत.

केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी काल अहिल्यानगर जिल्ह्यातल्या कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघांमध्ये राशीन इथं जाहीर सभा घेतली. यावेळी महायुतीचे उमेदवार राम शिंदे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची आज परभणी जिल्ह्यात सेलू इथं प्रचार सभा होणार आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आज लातूर इथं तीन सभा होणार आहेत. लातूर शहर मतदारसंघाचे उमेदवार

आमदार अमित देशमुख आणि लातूर ग्रामीण मतदारसंघाचे उमेदवार धीरज देशमुख यांच्या प्रचारार्थ निलंगा, गंजगोलाई इथं या सभा होणार आहेत.

****

येत्या दहा तारखेला मुंबईत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला जाणार आहे. काँग्रेस पक्षाचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. खरगे यांच्यासह लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांच्यासह काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते राज्याच्या विविध भागांत काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात काँग्रेसच्या ज्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतले नाहीत त्या सगळ्या बंडखोरांवर कारवाई करण्यात आली असून, त्यांना सहा वर्षांसाठी काँग्रेसमधून निलंबित करण्यात आल्याचं, तसंच राज्यात कुठेही मैत्रीपूर्ण लढत होणार नसल्याचं चेन्नीथला यांनी सांगितलं.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जागृतीसाठी राबवण्यात येणाऱ्या स्वीप कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय संचार ब्यूरो आणि भारत निवडणूक आयोगाच्या वतीनं एक फिरतं प्रदर्शन आजपासून सुरू होणार आहे. प्रदर्शन लावलेल्या या गाड्या १५ निवडक जिल्ह्यांमधे मतदानविषयक जनजागृतीचा संदेश घेऊन जाणार आहेत.

****

निवडणुकांमध्ये मतदारांना प्रलोभनं देण्याची प्रकरणं रोखण्याच्या उद्देशानं अंमलबजावणी यंत्रणांनी आत्तापर्यंत राज्यात केलेल्या कारवाईत, सुमारे २८० कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. यंदाच्या निवडणूक काळातली ही जप्ती २०१९च्या निवडणूक काळाच्या तुलनेत साडेतीन पटीनं जास्त असल्याचं आयोगानं म्हटलं आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन

प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज अमरावती जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

राज्यात येत्या २० तारखेला होणार्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी केलं आहे.

****

सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. नवी दिल्ली इथं काल दहशतवाद विरोधी परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. तीन नव्या फौजदारी कायद्यांमुळे नागरिकांच्या अधिकारांचं रक्षण होत असल्याचं शहा म्हणाले. कर्तव्य निभावत असताना हुतात्मा झालेल्या ३६ हजारांहून अधिक पोलिसांना त्यांनी आदरांजली अर्पण केली. राष्ट्रीय तपास संस्थेनं या दोन दिवसीय परिषदेचं आयोजन केलं आहे. केंद्रीय तपास संस्थांचे अधिकारी, न्यायवैद्यक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील वरिष्ठ पोलीस अधिकारी यांची परिषदेला उपस्थिती आहे.

****

निवडणूक आयोगानं दिलेल्या निर्देशांनुसार जिल्ह्यातल्या मतदान केंद्रांवर प्राथमिक आरोग्य सुविधा देण्याचं नियोजन करण्यात यावं, असे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी काल आरोग्य यंत्रणांना दिले. यासंदर्भातल्या बैठकीत ते बोलत होते. मतदान केंद्रांवर द्यावयाच्या वैद्यकीय सुविधांबाबत निवडणूक आयोगाच्या निर्देशांची माहिती यावेळी उपस्थितांना देण्यात आली.

****

हिंगोली इथं प्रचारात सहभागी झालेल्या ग्रामसेवकावर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कळमनुरी पंचायत समितीचे ग्रामसेवक शिवशंकर गुट्टे यांची शिवसेना पक्षाच्या कार्यकर्त्यांच्यावतीनं प्रचार करत असतानाची चित्रफित समाज माध्यमांवर प्रसारित झाली. त्यानुसार कारवाई करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी प्रतिक्षा भुते यांनी दिले आहेत.

****

बीडचे निवडणूक निरीक्षक एस.मल्लिका यांनी काल गेवराई मतदार संघातल्या जतेगाव, खामगाव, माहर टाकळी फाटा चेक पोस्ट, तसंच मिर्कला गावातल्या संवेदनशील मतदान केंद्रांना भेट दिली. गढीच्या नवोदय विद्यालय इथल्या स्ट्राँग रूमलाही त्यांनी भेट दिली. कर्तव्यावर असलेल्या अधिकारी आणि पोलिस अंमलदार यांना सतर्क राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

****

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर जिल्ह्यातल्या दोन हजार १४२ मतदान केंद्रं आणि एक सहाय्यकारी मतदान केंद्रासाठी आवश्यक मतदान यंत्रांचं दुसरं सरमिसळीकरण काल जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये झालं. यामध्ये मतदान केंद्रनिहाय मतदान यंत्रांचे क्रमांक निश्चित झाले. या सरमिसळीकरण प्रक्रियेबाबत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी सर्व उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींना याबाबत माहिती दिली.

****

बीड विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीत जवळपास २३ हजार ४७१ नावांची दुबार नोंदणी झालेली असल्याचा दावा करत, ही नावं मतदार यादीतून वगळावीत, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज्य उपाध्यक्ष अशोक तावरे यांनी बीडचे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे केली आहे. याबाबत आतापर्यंत दोन वेळा तक्रार दाखल झाल्याचंही त्यांनी सांगितलं आहे.

****

जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं काल छत्रपती संभाजीनगर चौफुली परिसरातून एका कारमधून ५२ लाख ८९ हजार रुपयांची रोकड जप्त केली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या नाकाबंदी दरम्यान ही कारवाई करण्यात आली. व्यावसायिक अभिजित मोहन सावजी यांच्या मालकीच्या कारमध्ये आढळून आलेली ही रोख रक्कम पुढील कार्यवाहीसाठी चंदनझिरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरातही सुत गिरणी चौकात पोलिसांनी काल ४० लाख रुपये रोख रक्कम जप्त केली. याप्रकरणी पुढील चौकशी सुरु आहे.

****

धाराशिव इथं काल भारत स्काऊट-गाईड वर्धापन दिन तसंच विद्यार्थी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा संघटक विक्रांत देशपांडे आणि

तेरणा स्पर्धा परिक्षा अध्ययन केंद्राचे ग्रंथपाल विठ्ठल गायकवाड यांच्या हस्ते लॉर्ड बेडन पॉवेल आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर याच्या प्रतिमांचं पूजन करण्यात आलं.

✻✻✻✻